**नागरी संरक्षण,**
**महाराष्ट्र राज्य, मुंबई**

# युद्धसदृश्य परिस्थितीत शाळांसाठी सर्वसाधारण सूचना

विद्यार्थी, कर्मचारी आणि शाळेच्या सुरक्षिततेसाठी युद्धसदृश्य परिस्थितीत खालील सूचना पाळणे अत्यावश्यक आहे:

१. अधिकृत स्त्रोतांकडून माहिती घेणे:-

- मुख्याध्यापक किंवा नेमलेला सुरक्षा अधिकारी स्थानिक प्रशासनाशी सतत संपर्क ठेवेल.
- अधिकृत शाळेच्या माध्यमांद्वारे (एसएमएस, ईमेल, व्हॉट्सअ‍ॅप ग्रुप) कर्मचाऱ्यांना व पालकांना खात्रीशीर माहिती द्या.

२. वर्गांची सुटका (सरकारने निर्देशित केल्यास):-

- शाळा बंद ठेवण्यासाठी किंवा ऑनलाइन शिक्षणासाठी सरकारच्या सूचनांचे पालन करा.
- पूर्वतयारी केलेल्या ऑनलाइन मॉड्यूल्स किंवा वर्कशीटद्वारे शिक्षण सुरू ठेवा.

३. शाळेतील सुरक्षा उपाय:-

- सुरक्षित आश्रयस्थळे ठरवा आणि चिन्हांकित करा: खिडकी नसलेली खोल्या, बेसमेंट, अंतर्गत मार्ग.
- सर्व दरवाजे बंद ठेवा; केवळ अधिकृत व्यक्तींना प्रवेश द्या.
- रोल कॉल घेऊन विद्यार्थ्यांची उपस्थिती यादी नियमित तपासा.

४. आपत्कालीन तयारी:-

- आपत्कालीन किट तयार ठेवा: टॉर्च, प्राथमिक उपचार, पाणी, आपत्कालीन संपर्क यादी, मेगाफोन/शिट्टी, इत्यादी.
- इंटरकॉम किंवा Public Announcement System कार्यरत ठेवा.

५. हवाई हल्ला सायरन / सरावानंतर:-

- ताबडतोब सर्व विद्यार्थ्यांना व कर्मचाऱ्यांना सुरक्षित ठिकाणी नेणे.
- सर्वांना खाली बसण्यास, डोकं झाकण्यास, खिडक्यांपासून दूर राहण्यास सांगा.
- सूचना असल्यास दिवे व विद्युत उपकरणे बंद करा.
- शांत राहा; विद्यार्थ्यांना सांभाळण्याकरिता स्टाफ नेमा.

६. विद्यार्थी सुरक्षा व पालकांशी संपर्क:-

- अनधिकृत पिकअपसाठी परवानगी देऊ नका.
- शाळेच्या ॲप किंवा एसएमएसद्वारे पालकांना सतर्कता, सूचनांबाबत माहिती द्या.
- प्रत्येक बाहेरील दरवाजाजवळ विद्यार्थ्यांच्या आपत्कालीन संपर्कांची यादी ठेवा.

७. स्थलांतर योजना (गरज पडल्यास):-

- गरज भासल्यास स्थानिक प्रशासनासोबत Evacuation Plan साठी वाहतुकीचे नियोजन करा.
- प्रत्येक वर्गासोबत शिक्षक नेमून ठेवा.
- विशेष गरज असलेल्या दिव्यांग, मतिमंद विद्यार्थ्यांना आवश्यक मदत पुरवा.

८. मानसिक आधार:-

- शांत आणि आश्वासक वातावरण तयार करा.
- सरावानंतर किंवा सतर्कतेनंतर गरज असल्यास मूलांना सल्ला द्या.
- शिक्षकांनी मुलांना योग्य पद्धतीने समजावून द्यावे. ज्यायोगे त्यांच्यामध्ये घबराटीचे वातावरण निर्माण होणार नाही.

९. आपत्कालीन संपर्क क्रमांक (स्टाफ रूम, रिसेप्शन, वर्गात लावा):-

- आपत्ती व्यवस्थापन विभाग मदत कक्ष – १०७० / १९१६ / ९३२१५८७१४३
- मुंबई पोलिस – १०० / ११२
- मुंबई अग्निशमन केंद्र – १०१, २३०८५९९२
- रूग्णवाहीका – १०८
- महिला मदत कक्ष – १०३
- अल्पवयीन मुलांकरिता मदत कक्ष – १०९८
- वन विभाग – १९२६
- गॅस गळती मदत कक्ष (LPG) – १९०६
- BEST पॉवर (शहर) – ८८२८८३०२८८, ९९३०९०११९३
- अदाणी एनर्जी (पश्चिम उपनगरे आणि पूर्व उपनगरांचा काही भाग) – ५०५४९१११, ५०५४७२२५
- महाराष्ट्र राज्य इलेक्ट्रिसिटी बोर्ड (पूर्व उपनगरे) – १८००-२३३-२३४५, ९९३०२६९३९८
- टाटा पॉवर (चेंबूर)– ६७१७५३६९
- रेल्वे संरक्षण दल (RPF): १८२ (ट्रेन-संबंधित आपत्कालीन परिस्थितींसाठी)

१०. पालक व कर्मचाऱ्यांसाठी संदेश:-

आपल्या मुलांच्या सुरक्षिततेला आम्ही सर्वोच्च प्राधान्य देतो. शाळा सर्व नियम व प्रशासनाच्या सूचना काटेकोरपणे पाळत आहे. कृपया शांत रहा, सहकार्य करा आणि अधिकृत संपर्क माध्यमांवरून माहिती घ्या.

## नागरी संरक्षण कार्यालय, मुंबई यांचे कडून जनहितार्थ प्रसारित